फौ.कि.अर्ज क्र.३४३/२०२२
फातेमाबी वि. ग्रामसेवक
CNR NO.MHLA120037952022

निशाणी क्र.१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार नामे फातेमाबी अब्दुल वहाब शेख यांनी त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मौजे तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर यांनी घ्यावी म्हणून आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन संक्षिप्तपणे असे की, अर्जदार यांचा जन्म मौजे तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथे दि.२२/०७/१९६५ रोजी झालेला आहे. परंतु, त्यांच्या जन्माची माहिती ग्रामपंचायतीमध्ये न दिल्यामुळे जन्माची तशी नोंद ग्रामपंचायतीला नमुद नाही. अर्जदाराने ग्रामपंचायतीकडे त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या दाखल्याची मागणी केली असता संबंधित अधिका–याने नोंद करण्यात आलेली नसल्याचे सांगितले. त्यामुळे, जन्माची नोंद करुन तसा दाखला देण्याचे आदेश ग्रामपंचायत तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथील जन्म–मृत्यू नोंदणी अधिका–यास देण्यात यावेत अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

३. अर्ज दाखल झाल्यानंतर, दि.१८/११/२०२२ रोजीच्या दैनिक रत्नापूर समाचार या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देण्यात येऊन हरकत असल्यास कळविण्याचे आवाहन करण्यात आले. जाहीरनाम्याची योग्य ती बजावणी केली गेली. परंतु, प्रस्तुत अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराने त्यांचे कथनांचे पुष्टयर्थ ग्रामपंचायत तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ यांचेकडील दि.०१/११/२०२२ रोजीचा दाखला दाखल केलेला आहे. उपरोक्त दाखल्यावरुन असे दिसून येते की, अर्जदाराच्या जन्माची नोंद संबंधित अभिलेखाला नाही.

४. अर्जदाराने प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ, त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. वरील साक्षीदाराने त्यांचे शपथपत्रामध्ये त्यांचा जन्म दि.२२/०७/१९६५ रोजी मौजे तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथे झाल्याचे कथन केलेले आहे.

५.  अर्जदाराच्या म्हणणयाप्रमाणे, त्यांना शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी जन्माचा पुरावा म्हणून जन्म दाखला आवश्यक आहे. उपरोक्त पुरावा व कागदपत्रे यांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदार नामे फातेमाबी अब्दुल वहाब शेख यांच्या जन्माची नोंद जन्म–मृत्यू अभिलेखाला झालेली नाही. सबब अर्जदाराच्या शपथपत्रातील मजकुराचा विचार करता, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे–

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ग्रामसेवक, ग्रामपंचायत तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत अर्जदार नामे फातेमाबी अब्दुल वहाब शेख यांचा जन्म दि.२२/०७/१९६५ रोजी झाल्याबाबतची नोंद जन्म–मृत्यू अभिलेखामध्ये सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत करुन घ्यावी व नियमाप्रमाणे शुल्क भरुन घेऊन तशा प्रकारचा दाखला अर्जदारास द्यावा.

३. प्रस्तुत आदेश संबंधितांना कळविण्यात यावा.

Digitally signed by
SHAIKH NAZAKATBI
ABDUL LATIF
Date: 2022.12.22
17:13:55 +0530

निलंगा. (एन.ए.एल. शेख)

दि.२२/१२/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट नं.२), निलंगा.